# विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालय

सामान्य शाखा

दुरध्वनी क्र.0253-2462401

मेल आयडी-crunsk-divcom@mah.gov.in

क्र.झेरॉक्स/2026-27/सा.शा 3/ जा. क्र. 68

दिनांक - 06/5/2026

## जाहीर नोटीस

सन 2026-27 या वर्षाकरीता माहे जुन -2026 ते एप्रिल -2027 या कालावधीकरीता विभागीयआयुक्त कार्यालयात झेरॉक्स सुविधा पुरविणेबाबत या प्रसिद्धीपत्रकान्वये इच्छुक असलेल्या स्थानिक झेरॉक्स दुकानदारांकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहे.

या करीता इच्छुक झेरॉक्स दुकानदारांकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन आपली दरपत्रके दि.06/05/2026 ते दि.15/5/2026 पावेतो तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचेकडेस कार्यालयीन वेळेत सादर करावीत.

## अटी व शर्ती

1) दरपत्रक धारकाकडे झेरॉक्स व्यवसाय चालविणेकरीता आवश्यक असलेला सक्षम अधिकारी यांचा परवाना (शॉपअ‍ॅक्ट लायसन्स) असणे आवश्यक आहे.

2). दरपत्रक धारकाला विभागीय आयुक्त कार्यालयाचे आवारात झेरॉक्स सुविधा पुरविणेसाठी तीन झेरॉक्स मशिन व त्याबाबतची तांत्रिक माहिती असलेल्या ऑपरेटरची नियुक्ती कार्यालयीन वेळेत (सकाळी 9.45 ते सायं. 6.15) करावयाची आहे.

3). झेरॉक्स साठी वापरण्यात येणा-या शासकिय जागेचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियमानुसार दरमहा भाडे रक्कम रु.989/- व लाईटबील 5 तारखेच्या आत भरणे आवश्यक आहे.

4). दरपत्रकामध्ये दर सादर करतांना ए-4 पेपर, लिगल पेपर, ए-3 पेपर व इतर पेपर करीता प्रती कॉपी दर या प्रमाणे दर सादर करावेत.

सदरची जाहिर प्रसिद्धी आज दि. 06/05/2026 रोजी नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केलेली आहे.

मा. विभागीय आयुक्त,
नाशिक यांच्या मान्यतेने

( सुदाम परदेशी )
प्र.अपर आयुक्त (सामान्य प्रशासन)
विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक